# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६५/२००७/३४**
**तक्रार दाखल दिनांक ;- २३/१०/२००७**
**निकाल दिनांक ;- १३/११/२००७**

**सौ. शशीकला पंढरीनाथ गवई,**
एफ - २६/८,संभाजी कॉलनी,
एन ६ सिडको , औरंगाबाद. अर्जदार/ग्राहक

**विरुध्द**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
शहर मंडळ, औरंगाबाद.

विषय ;- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल)विनियम २००६ च्या अंतर्गत गा-हाणे.

१) अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र. विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल) विनियम २००६च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दिनांक २३/१०/२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २३/१०/२००७ रोजी

औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) औरंगाबाद. व नोडल अधिकारी यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०७/११/२००७ रोजी ठेवण्यात आली.

२) ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

अर्जदाराचे चार खोली असलेले घर असून त्याने ऑक्टोबर २००६ मध्ये घरगुती वापरासाठी नविन वीज पुवठा घेतला त्यांचा वीज वापर कमी असल्यानंतर त्यांना वीज कंपनीकडून ४८६ युनिट वापराचे बिल देण्यात आले. दिनांक ३०/१०/२००६ रोजी त्यांनी या बाबत केलेल्या तक्रारीवरुन त्यांच्या वीज मीटरचे निरीक्षण करण्यात आले व त्याजागी नविन मीटर लावण्यात आले. दिनांक १८/११/२००६ रोजी रुपये ४०९०/- चे मागिल थकबाकीसहीत बिल देण्यात आले याबाबत वीजकंपनीच्या संबधित अधिका-याकडे तक्रार केल्यानंतर त्यांना रुपये २०००/- चा भरणा करण्याचे सांगण्यात आले. जानेवारी २००७ मध्ये कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांचा वीज पुरवठा या चुकीच्या वीज बिला पोटी खंडीत करण्यात आला. त्यांचे जुने मीटर फॉल्टी असतांना ते बरोबर असल्याचे दाखवण्यात आले असल्याचे अर्जदाराने आपल्या तक्रारीत म्हटले आहे.अर्जदाराने या बाबत अनेकवेळा केलेल्या तक्रारीची दखल वीज कंपनीने घेतली नसल्यामुळे त्यांनी ती तक्रार मंचात दाखल केली आहे व त्यांना देण्यात आलेले बिल दुरुस्त करुन देण्याबाबत तसेच खंडीत करण्यात आलेला वीज पुरवठा पुर्नजोडनी बाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

३) दिनांक ०७/११/२००७ रोजी मंचासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी नोडल अधिकारी श्री एस. जी. पवार हे महावितरण कंपनी तर्फे उपस्थीत होते. ग्राहक प्रतिनिधी म्हणून श्री राहुल गवई हे उपस्थीत.

होते. सुनावणीच्यावेळी महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री पवार यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला. ज्याची एक प्रत अर्जदाराच्या प्रतिनिधीस देण्यात आली. नोडल अधिकारी यांनी दाखल केलेल्या जबाबानुसार अर्जदारास नविन वीज पुवठा देण्यात आल्यानंतर त्याच्या तक्रारीवरुन जूने मीटर बदलण्यात आले व त्या मीटरची चाचणी केल्यानंतर ते योग्य असल्याचे आढळले अर्जदारास देण्यात अलेले विज बिल हे योग्य असून अर्जदाराची तक्रार खारीज करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

४) दोन्ही बाजूकडून मंचात दाखल करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सूनावणी वरुन असे आढळून येते की, महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास ऑक्टोबर २००६ मध्ये घरगूती वापरासाठी वीज पुरवठा देण्यात आला. त्याला देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९००१२२७९२११ असा असून जुन्या मिटर चा क्रमांक ०२०९७१३७ असा आहे. अर्जदाराने दिनांक १६/१०/२००६ रोजी मीटर बाबत केलेल्या तक्रारीवरुन दिनांक ३०/१०/२००६ रोजी त्यांच्या मीटरचे वीजकंपनी तर्फे निरीक्षण करण्यात आले. या निरीक्षण अहवालाचे अवलोकन केल्यानंतर असे आढळून येते की, मीटर चे सिल हे व्यवस्थीत असून एक बल्ब व एक टिव्ही चा वीजभार जोडलेला आहे. सदरील वीज मीटरचे रिडींग ०००६३० असून सदरील मीटर फास्ट आहे असा शेरा या निरीक्षण अहवालावर नमूद केला आहे. ग्राहकाने मीटर टेस्टींगची रक्कम भरल्यानंतर दिनांक ०६/११/२००६ रोजी मीटर बदलण्यात आले या मीटर बदलीच्या अहवालाचे निरीक्षण केल्यानंतर जुने वीज मीटर क्रमांक ०२०९७१३७ या जागी नविन मीटर क्रमांक ०१०४४७७२ असे लावण्यात आल्याचे आढळून येते. जुने मीटरचे सील हे व्यवस्थीत असून मीटर बदलण्याचे कारण हे

फॉल्टी मीटर असे नमूद केल्याचे आढळते अर्जदाराच्या जुन्या मीटरच्या दिनांक ०७/१२/२००६ रोजी केलेल्या तपासणी अहवालात मीटर ओके असल्याचे म्हटले आहे. पण या अहवालावर ग्राहक / ग्राहक प्रतिनिधी याची सही आढळून येत नाही त्याच प्रमाणे ग्राहकास मीटर तपासणीच्या वेळी उपस्थीत राहण्याबददल कळविल्याबाबत कोणतेही कागदपत्रे नोडल अधिका-यांनी आपल्या दाखल केलेल्या जबाबा सोबत जोडलेले नाही. नोडल अधिका-या तर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या सी. पी. एल. चे निरिक्षण केल्यावर ग्राहकास जुने मीटर आसतांना ऑक्टोबर, नोव्हेम्बर व डिंसेम्बर २००६ या महीन्यासाठी अनुक्रमे ४८६,४८६ व २७३ युनिट चे वीज बिल आकरण्यात आले जूने मीटर बदलल्यानंतर जानेवारी २००७ ते सप्टेंबर २००७ या नऊ महिन्याच्या काळातील ग्राहकाचा सरासरी वीज वापर हा दरमहा ४५ युनिट असा आढळून येतो. वीज निरीक्षण अहवाल व मीटर बदलण्याचा अहवालावर सुध्दा मीटर फॉल्टी असल्याचा उल्लेख आढळतो त्याचप्रमाणे मीटर तपासणी ही ग्राहकाच्या उपस्थीत झाली नसल्याचे स्पष्ट होते.ग्राहकाने वीज बिल दूरुस्त करण्याबाबत केलेल्या अर्जाची दखल न घेता त्याचा वीज पुरवठा कोणतीही लिखीत पुर्व सुचना न देता खंडीत केल्याचे दिसून येते. यावरुन वीज कंपनीने वीज कायदा २००३ मधील कलम ५६ (१) चे उल्लंघन केल्याचे दिसून येते.

वरील सर्व बाबींचे निरीक्षण केल्यावर अर्जदाने दाखल केलेली तक्रार योग्य असून मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

.

# आदेश

१) वीज कंपनीने अर्जदाराचा खंडित केलेला वीज पुरवठा २४ तासात कोणताही जोडणी आकार न लावता पुनर्जोडणी करुन देण्यात यावा.

२) अर्जदारास देण्यात आलेली ऑक्टोबर २००६ ते डिंसेम्बर २००६ या काळातील वीज बिले रदद करण्यात येत आहेत.

३) वरील कालावधीसाठी अर्जदारास ४५ युनिट प्रति माह या सरासरीवर आधारीत बिल देण्यात यावे व त्याप्रमाणे पुढिल सर्व बिले ३० दिवसात सुधारीत करुन देण्यात यावी.या सुधारीत बिलात कोणतेही व्याज वा दंड आकरण्यात येऊ नये.

४) अर्जदाराने सदरील सुधारीत बिल मिळाल्यापासून तिन आठवडयात त्याचा भरणा करावा.

५) कोणतीही लीखीत पुर्व सुचना न देता ग्राहकाचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आल्यामुळे वीज कंपनीने रुपये ५००/- नुकसानभरपाई म्हणून अर्जदारास ३० दिवसात दयावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **विजय गो. जोशी** | **विष्णु अ. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


**क्र.सीजीआरएफ/एझेड/एयुआर/यु/६५/२००७/३४** **दिनांक ;-**

**प्रति,**

**१) कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद.**

**२) सौ. शशीकला पंढरीनाथ गवई,**
एफ - २६/८,संभाजी कॉलनी,
एन ६ सिडको , औरंगाबाद.

**विषय ;-** क्र.सिजीआरएफ/एझेड/अेयुआर/यु/६५/२००७/३४
गा-हाण्याचा आदेश.

वरिल विषयातील गा-हाण्याचा आदेश या पत्रा सोबत जोडला आहे.

ग्राहकास, जर आदेश मान्य नसेल तर तो विद्युत लोकपाल ( खाली दिलेला पत्ता ) यांच्याकडे आपले गा-हाणे आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आंत दाखल करु शकता.

सोबत ;- वरिल प्रमाणे.

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा ईमारत,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**